
# छन्द

## काव्य संग्रह

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६६



REFBK-0025546
REFBK-0025546

प्रभाकर अत्रे

# छंद

(कविता संग्रह)

लेखक

**प्रभाकर अत्रे**

REFBK-0025546

REFBK-0025546

प्रतिमा प्रकाशन, पुणे – ३०.

प्रकाशन क्र. ३६

प्रकाशक : अरुण वि. पारगावकर
प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे ३०.

मुद्रक : द. शं. रायकर
न्यू नटराज प्रिंटर्स, १३।१४ सदाशिव पेठ, पुणे ३०.

© सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती : २४-९-८७

मुखपृष्ठ : अभय पुरंदरे

मूल्य : १० रुपये

ह्या पुस्तकाचे प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

दिवंगत

आई-वडील

आणि

बंधु-भगिनी

यांच्या प्रेमळ स्मृतीस

-प्रभाकर

# कवितानुक्रम


१. कर्तव्यसिंधु आई ५
२. ते चित्र लोकोत्तर ! ६
३. चित्रातल्या बालका ! ७
४ सांगू काय, कशी ? ८
५ भर्तृहरीचे शल्य १०
६ श्री संत ज्ञानेश्वर १२
७ तेव्हा आणि आता १४
८ भावमीलन १६
९ मिथ्याच की तोवरी १७
१० इरेस पडलो तर बच्चम्‌जी १८
११ पणती २०
१२ बाबांची कविता २१
१३ अश्शी बालमुद्रा २३
१४ तेव्हापासुनि २५
१५ वैधव्यातिल सौभाग्य ! २६
१६ दानत २८
१७ मिष्किल प्रश्न २९
१८ वृक्षपालवी ३०
१९ आई ३२
२० प्राणीसंग्रहालयात मानव ३४
२१ तू आणि मी ! ३५
२२ आम्ही ३६
२३ शोध ३७
२४ अश्शी कविता ३९
२५ श्रावणमास ४०
२६ पुढाऱ्याची विरामचिन्हे ४२
२७ महाराष्ट्राच्या भूमीमध्ये ४४
२८ विठ्ठला ४६
२९ दुःखसुखाची कथा ४७
३० कै. साने गुरुजी यांना विनंति ४९
३१ तू येणार म्हणून ! ५१
३२ ‘त्यांची’ पगडी ५३
४३ इथे ५४
३४ मनोगत ५६
३५ येईल का भारती ? ५७
३६ मुंगीची तक्रार ५९
३७ जिथल्या तिथे! जागच्या जागी! ६०
३८ स्वराज्यातली कमाई ! ६३

## १. कर्तव्यसिंधु आई

(बांगला देश निर्मितीत घडलेली एक हृदयद्रावक घटना)

साहूनि यातनांना । राहूनिया उपाशी
देशान्तरा निघाले । ते दीन वंगवासी
नि:शस्त्र चालताना । मार्गात वायुवेगे
आवाज बंदुकांचा । करि तान्हुल्यास जागे

भयभीत लेकराला । आई धरी उराशी
परि दूध आटलेले । भागेल भूक कैशी ?
आकान्त सानुल्याचा । ऐकूनि ऊर फाटे
ते मातृदेवतेचे । दु:खात दु:ख मोठे

व्याकूळल्या स्वरांची । ती आर्त अश्रुगंगा
रोखुनि वाट घेई । पांथस्थ वंगसंघा
चाहूल सैनिकांची । आली पुन्हा विनाशी
चिंतेत त्या मुलाच्या । परि गुंतले प्रवासी

प्रार्थी तदा प्रभूते । ती माय दीनवाणी
'आपत्ति धर्म आता । करिते तुला स्मरोनी'
रुद्रस्वरूप माते । दाबून नाक तोंड
श्वासास बालकाच्या । केले क्षणात बंद

अवरोध दूर होता । चाले पुन्हा भ्रमंती
निर्धोक भारती या । लाभे तयास वस्ती
आता मुक्या मनाने । माता फिरे स्वदेशी
शोधीत लाडक्याला । उकरीत प्रेतराशी

---

## २. ते चित्र लोकोत्तर

नेमाने तव पावले उमटती मोदे मदीयांगणी
छोटी, सुंदर हालवीत परडी येशी गडे कोठुनी ?
शेवंती, मधुमालती, बकुळ तो, प्राजक्त, चाफेकळी
सर्वांची तव स्वागती खुलतसे हर्षातिरेके कळी

होई चित्त क्षणीच तन्मय तुझे मोदे फुला स्पर्शिता
सौगंधे भरल्या वनी गमतसे तू स्वर्गिची देवता
ब्रह्यानंद सहोदरा म्हणुनि जी तृप्ती कवी वर्णिती
उत्साहे चमके मुखावरि तुझ्या सुस्पष्ट होऊनि ती

ऐशा या फुलराणिला सुखविण्या नेमेचि आनंदुनी
पुष्पांचा मृदु गालिचा पसरतो वारा मदीयांगणी
ते सौंदर्य विलोभनीय म्हणुनी त्या गौरवाच्या क्षणी
सोनेरी किरणे हळूच बघती सानंद पूर्वेतुनी

पुष्पांचा करुनी सुरेख गजरा का तू शिरी खोविशी ?
माला गुंफुनि वा प्रसन्नहृदये का देवता पूजिशी ?
वा चित्ती ठसल्या कुणा प्रियकरा का गुच्छ तू अर्पिशी ?
या प्रश्नांस असेल उत्तर तरी त्याची नको चौकशी !

माझ्या अंगणिची फुले तव करी आनंद जो भोगिती
त्याची प्राप्ति मला जरी नच तरी तृप्ती असे ज्ञात ती
त्या तृप्तीस्तव ये प्रभात समयी देऊ नको अतंर
दारा आडुनि सर्वथा बघिन मी ते चित्र लोकोत्तर

----

## ३. चित्रातल्या बालका !

मातेच्या बसुनी कडेवर गडचा माझ्याकडे पाहशी
सारे सात्विक भाव एकवटुनी नेत्री तसे मानसी
आईच्या नजरेत कौतुक तुझे, वात्सल्यही ते दिसे
दुर्लक्षून तयास चत्त तव का माझ्याकडे रे असे ?

नातेवाईक, मित्र त्यापरि कुणी माझ्या करी कौतुका
मुद्रा राखुनि शांत शीतल तुझी तू पाहशी त्या सुखा
एखाद्या क्षणी ये मनात भलते वा खाजगी काहि ते
तेव्हाही तव शांतता न ढळते, मुद्रा उगी राहते

जेव्हा अंथरुणावरी विव्हळतो मी वेदना होऊनी
तू मित्रासम सोबतीस असशी, वाणी मुकी घेउनी
दुःखाच्या मम यातना मज गमे चित्तात तू ठेविशी
'छोटया देहि कसे विशाल मन ते आहे' मला दाविशी

वाटे येउनिया तुझ्याजवळ मी घ्यावे तुला ओढुनी
'द्यावी सुंदर वस्तुभेट तुजला' इच्छा असे मन्मनी
स्वीकारार्थ परंतु हात हवला देशील का रे पुढे ?
ऐसा येइ मनी विचार म्हणुनी कोडे मला ते पडे

वारंवार असा पहात वसतो तूझ्याकडे सारखा
प्रेमाने तरि बोल भिंतीवरच्या चित्रातल्या बालका !

----

※

## ४. सांगू काय, कशी ?

( आपल्या नवप्रसूता कन्येस तिच्या वैधव्याची वार्ता कळविण्याचा एका मातेवर ओढवलेला दुर्धर प्रसंग)

कन्येच्या नव अर्भकास बघुनी संतोषली माउली
दृष्टी पाहुनि शून्यवत् परि तिची कन्या तिला बोलली
गोरा गोंडस बाळ हा चिमुकला माझा गडे तान्हुला
आई, सांग बघूनि यास तुज का आनंद ना जाहला ?

कन्येच्या मुखि शब्द ते परिसता नेत्रात अश्रुजले
आली दाटुनि शांत त्या जननिच्या कारुण्य ओसंडले
'शंका दुष्ट अशी कदापि न वसो' आई वदे तत्क्षणी
प्रेमाने हळुवार हात फिरवी पाठीवरी सान्त्वनी

'आई, सांग निरोप एकच 'तयां'-भेटावया बालका
तब्येतीस मिळेल स्वास्थ्य तुमच्या, तेव्हा सुखे याल का ?'
दोघांच्या दृढ प्रकृतीस बघता निश्चित व्हावी मने
यापेक्षा नलगे तयास इथुनी ते वेगळे सांगणे !

सेवेला परिचारिका नित उभी, सारी व्यवस्था इथे
आहे सिद्ध करावयास मनिषा, सद्भाग्य अन् कोणते ?
छोटे काम परी तुझ्यास्तव तरी मी ठेविले राखुनी
सौभाग्य प्रतिकार्थ येथ मजला ये कोयरी घेऊनी



छंद

आई, या छकुल्यास घेऊनि उद्या जाऊ सुखाने घरी
वाटे खेद परी, कशी विसरशी आणावया कोयरी !
'देवा, दाखवि तन्मुखास !' वदता कंठात ये हुंदका
'सांगू काय, कशी?' वदे जननि ती, 'हा बाळ गे पोरका!'

---

## ५. भर्तृहरीचे शल्य

एके दिवशी शिक्षणमंत्री अवचित भेटीला
ग्रंथ संग्रहालयी पातले सोडूनि कामाला
ज्ञान तयांचे अपार आणिक वाचनही खोल
मुके त्यापुढे ग्रंथ बापुडे आणि ग्रंथपाल

ते गरिबांचे वाली, त्यांना नीतीचा पुळका
सोडीत होते त्यांच्यासाठी मेंदूच्या झुळका
'नीतिशिक्षण, शिक्षणनीती' मनात पुटपुटता
भर्तृहरीचे 'नीतिशतक' ते सापडले हाता

विचार करिती एकांती ते श्लोकाश्लोकाचा
'नीतिशिक्षणासाठी' म्हणती ग्रंथ हाच साचा
श्लोक नव्हे तो, कायद्यातले तेच खरे कलम
पालन करणे शिक्षणकार्यी हाच खरा धर्म !'

बोचत होती भर्तृहरीला शल्ये जी सात
पुढे न जाई तिथूनी शिक्षणमंत्र्यांचे बोट
विद्वज्जनिच्या दारिद्र्याने कळवळले हृदय
दीनोद्धारक नेत्री होई अश्रूंचा उदय

विचारसागरि पूर्ण लोटले तयास श्लोकाने
नकळे केव्हा मिटलीपुढची ग्रंथाची पाने
दुसरे दिवशी राज्यामाजी आज्ञा ती झाली
गुरुवर्यांना वेतन द्यावे भरोनिया थैली

व्यर्थ नाडिले तयास आता मिळु द्या आनंद
त्यांच्यासाठी शिक्षणखाते उभारील फंड !

‘विद्वानांस्तव धनप्राप्ती’ची श्रवुनि घोषणा ती
धनप्राप्तीस्तव सुरू जाहली मग विद्वत्‌भरती

विद्यार्थीही सुखावला अन् वाटे त्यास बरे
‘गुरुकिल्लीने’ ‘म्हणे,’ उघडू या दरवाजे सारे !’
जो तो येई हात धुवाया शिक्षणगंगेत
पदवी आणिक प्रशस्तिपत्रक सर्वच ते स्वस्त

आलस्यासह प्रवेश केला अनेक गोष्टींनी
रसातळाला ज्ञान पोचले तेव्हापासोनी
भर्तृहरी ! ती शल्यवेदना नसे कुणापुरती
शिक्षणक्षेत्री चिरंजीव ती अशी तिची ख्याती !

----

## ६. श्री संत ज्ञानेश्वर

अंधारी घनघोर रात्र पसरे वद्याष्टमीची तिथी
सृष्टीच्या लडिवाळ श्रावणसरी भूमीवरी नाचती
एकाकी परि चंद्र येइ उदया आकाशमार्गावर
लोकोद्धारणि भारती प्रकटले श्री संत ज्ञानेश्वर

'की हंसासम डौलदार गतिची गीर्वाणवाणी जरी
माझ्या प्राकृतवाणिचे पडू नये पाऊल का भूवरी ?'
विद्वानांस सवाल रोख पुसुनी केले जये अस्थिर
राष्ट्राचा कवि बंडखोर पहिला श्री संत ज्ञानेश्वर

ब्रह्मज्ञान जगातले अडकले गीर्वाण वाणीतुन
ते सामान्य जनाप्रती उकलुनी प्रेमे दिले वाटुन
ज्याच्या बालमुखातुनी वदतसे गीतार्थ योगेश्वर
ती प्रातःस्मरणीय वन्द्य विभुती श्री संत ज्ञानेश्वर

देही पावक प्रज्वलीत करूनी मांडे दिले भाजुनी
ती पाहूनि चमत्कृती चकित हो मुक्ताई अंतर्मनी
वेदांची वचने मुक्या पशुमुखी जो ऐकवी सुस्वर
साधू एकचि तो समर्थ जगती श्री संत ज्ञानेश्वर

'कर्तव्यी नित शुद्ध आचरण हो' बोलू तये बोलिला
तैसा शूर शिवाजि लोकविजयी राष्ट्रास नेता दिला
प्रवृत्तीपर भाविकाल नयनी ज्याते दिसे सुंदर
राष्ट्राचे अभिमानस्थान अवघे श्री संत ज्ञानेश्वर

काळाच्या नच चाळणीतुनि गळे, दे शक्ति राष्ट्राप्रत
वर्षे लोपुनि सातशे अमर ते सारस्वत प्राकृत
संतश्रेष्ठ लोकहृदयी ज्यांच्याप्रती आदर
ते आम्हा दिसतील का जगि पुन्हा श्री संत ज्ञानेश्वर ?

---

## ७. तेव्हा आणि आता

तेव्हा रोज फुले सुगंधित तुझ्या हाती गडे मी दिली
त्यांची सुंदर गुंफिता खुलतसे वेणी तुझ्या कुंतली
हाती घेउनि हात नित्य फिरलो मौजेत बागेतुनी
आजूबाजुस लोक काय म्हणती पर्वा न त्याची मनी

वाढे उत्सुकता मनात पहिली तारीख ती पाहूनी
प्रीतीपूर्वक भेट देई तुज मी साडी नवी त्या दिनी
शेजारीण-सखी सदैव हिणवी सद्‌भाग्य ते आपुले
केला द्वेष जरी, तरी तुज रुचे ते दुःख सौख्यातले

होते दूर जरी सिनेगृह तरी येता सिनेमा नवा
होतो काढित नित्य दोन तिकिटे सुट्टी असे जेधवा
खाली घालुनि मान लोक बघती जे दृश्य निंदात्मक
अंधारामधि आपणास गमले ते तेधवा मोहक

प्राप्ती आणिक खर्च यातिल कधी ना पाहिले अंतर
जे जे काही रुचे तयास्तव खिसा होता तदा तत्पर
होती मान सदैव ताठ अपुली पायात तैशी गती
जिंकाया जणु पृथ्विला निघतसे राजासवे राणि ती!

आता लोपुनि पंचवीस वरुषे तो काळ गेला दुरी
छे! छे! होउनि भूत येऊनि बसे ऐटीत मानेवरी
स्वप्नाळू नवसृष्टिची निजमनी ती लोपली चेतना
आता रंगविहीन चित्र बघता होती मना यातना

साडी केवळ पांघरुण म्हणुनी सेवा प्रजेची करी
पुष्पांच्या मृदु ओंजळीत पडती मिर्च्या नि कोथिंबिरी
संसारातील सौख्यस्नेह सरला, ती वैभवे लोपली
राजा राणिसवे पहात बसला चित्रे शिशिरातली

मोदे हिंडति जे तरुण तरुणी स्वच्छंद रस्त्यावरी
हक्काने उपदेशिण्या परि तया, ही संधि लाभे खरी !

----

*

## ८. भावमीलन

(कवी आणि त्याची दिवंगत बहीण यांचे हे भावमीलन)

माझे बोट धरून तू शिकविली, अभ्यासिली ती कला
माझ्या हाति तिचा विकास बघुनी संतोष साऱ्या कुळा
विद्वन्मान्य सभाजनी तिजप्रती सत्कार तो लाभता
आक्का, अंतरि दाटुनी तव स्मृती मी भोगियेली व्यथा

सांगाया मन धावते तुजकडे वेडया कवीच्या परी
ती सत्कार सभेतली सुवचने, जी साठली अंतरी
द्यावे दर्शन भावपूर्ण नयनी स्वप्नी तरी येउनी
भाऊच्या करि कौतुका निजमुखे प्रेमे मिठी मारुनी

होती आस अशी सुखावित जरी, हा जीव वेडावला
कालौघे मम पावले वळविली कैशी कळेना मला
सौभाग्यास्तव ज्या स्थळी उधळिल्या त्वन्मस्तकी अक्षता
आलो त्या शुभमंडपात वरुषे चोवीस ती संपता

मला घेउनि हाति मित्र भगिनी होती बरी त्यास्थळी
लावण्यकृति बोहल्यापरि तुझी, ठायी तिच्या पाहिली
झाली मुक्त मने, प्रसन्न हृदये, चोवीस वर्षांतल्या
भावोर्मी मनि दाटल्या, उमलल्या जैशा सुगंधी कळ्या

ते संभाषण संपता शुभदिनी अदृश्य भेटीतले
आहेरास्तव दोन अश्रु वधूच्या हातावरी ठेविले

----



छं२

## ९. मिथ्याच की तोवरी

'घ्यावे केवळ सान्ध्य भोजन !' असा निर्धार केला जरी
माझ्या या व्रतपालनार्थ अवघा मी त्याग केला तरी
ईर्षा-मत्सर आदि दोष मनिचे जातील ना जोवरी
माझा तो उपवास आणि व्रत ते मिथ्याच की तोवरी

जाणे मंदिरि पुष्पवृष्टि करणे तेथील मूर्तीवर
मंत्रोच्चारण हाति माळ धरुनी केले जरी नंतर
या कर्मी परि स्वार्थ लोभ मनिचा हो नष्ट ना जोवरी
पूजा त्यापरि कर्म-आचरण ते मिथ्याच की तोवरी

केले मी जपजाप्य त्यासह जरी सत्संगही लाधला
दृष्टी लावुनि आणि ध्यान धरुनी मी देव आराधिला
लोपे गर्व, अहंपणा नच परी चित्तातला जोवरी
माझी सर्व उपासना खचित ती मिथ्याच की तोवरी

एकांती बसलो निवांतपणि मी, मौनास स्वीकारले
वैराग्ये जरि नित्य नीरसपणे चोहीकडे पाहिले
इच्छावृत्ति परंतु शांत नसती देहातल्या जोवरी
माझी ती तपसाधना जगति या मिथ्याच की तोवरी

देवा, नाम तुझे सदैव स्मरुनी प्रार्थीन तूते जरी
प्रत्यक्षी हृदयी नसेल करुणा आनंद मैत्री तरी
सेवेला मम हस्त येइ न कधी कामी कुणा जोवरी
माझी ती जवळीक रे प्रभुवरा, मिथ्याच की तोवरी

----

*

## १०. इरेस पडलो तर बच्चम्जी –

१

इरेस पडलो तर बच्चम्जी
    लिहून दाविन मीही कविता
आणिक येइल कालिदासही
    पाय धराया बघता बघता !

२

विश्वप्रीतिचा, विश्वशांतिचा
    कवितेतील जयघोष पाहुनी
गीतांजलिचा तो उद्गाता
    टाकिल हातातली लेखणी !

३

इरेस पडलो तर बच्चम्जी
    मीही कविता लिहून दाविन
स्वर्ग सोडूनी येतिल भूवरि
    व्यास-वालिमकी-तुलसी-वामन !

४

    भक्तिरसाचा पूर पाहूनी
मानवतेचे प्रेम देखुनी
    तुकारामही निजगाथेला
इन्द्रायणिचे दाविल पाणी !

५

इरेस पडलो तर बच्चम्जी
    दाविन कविता मीही लिहुनी
नीरस वाटे जिच्यापुढे अन्
    ज्ञानेशाची अमृतवाणी !

६

नव्या मनूचे, नव क्रांतीचे
    नवेच घडता विचारदर्शन
स्फोटक-दाहक त्या प्रतिभेला
    केशवसुतही लवविल मान !

७

इरेस पडलो तर बच्चम्जी
    लिहून दाविन कविता मीही
    गूढार्थाते बघूनी होतिल
    नवकवि सारे खूष प्रत्यही !

८

मत्सामर्थ्याने थक्क होऊनी
    मंत्र्याहाती मिळेल पदवी
प्रकाश पाहुनि म्हणतिल सारे
    'कवी नसे हा असे रवि !'



छंद

९

विचार येई परी अंतरी
या साऱ्यांना पुशील कोण ?
माझ्यासम जर कवी जन्मले
राष्ट्रामध्ये घराघरातुन !

१०

म्हणूनि नियोजन मी प्रतिभेचे
करूनि रोखुनी प्रसिद्धिलाही
श्रेष्ठांचा सन्मान राखण्या
इरेस कधिही पडतच नाही !

(कविवर्य मर्ढेकरांची क्षमा मागून)

----

## ११ · पणती

जेव्हा पर्णकुटीत चन्द्रकिरणे पोचावया प्रत्यही
सामर्थ्ये अपुल्या अपूर्ण ठरली पैजेस लावूनही
रानातील दरी-गुहाहि नुजळे सूर्यप्रभा जेधवा
तेव्हा स्वत्वसमर्पणार्थ पणती आली पुढे तेधवा

'द्यावे तेल जरा पळीभर मला कापूस द्यावा क्षणी
तोही केवळ द्या चिमूट भरुनी–' ती बोलली तत्क्षणी
'तेजाने भवतालिचा सहजची अन्धार नाशीन मी
दावाया पुरुषार्थ सिद्ध जगती आहेच मी नेहमी'

विज्ञप्ती परिपूर्ण होउनि तिची संतोषली अंतरी
एका ज्योतिसवे त्वरे उजळूनी केली प्रतिज्ञा पुरी
अंधारी दुनिया क्षणी बदलली तेजःप्रकाशासवे
झाला हर्ष मनी, सुहास्य फुलले, चैतन्य आले नवे

गेली अर्पणभावना मग तिची स्पर्शून अन्याप्रती
त्यायोगे कुटिरात त्या चमकल्या तीच्या अनेकाकृती
तेजस्वी पुरुषार्थ तेथ प्रकटे त्या दीप्तिकाव्यातुनी
संगे दीपक राग आळवित ये त्यातूनि आत्मार्पणी

----

## १२. बाबांची कविता

बाबा काव्य लिहावयास बसता घेऊनि आला पुढे
बाळचा कागद लेखणी, नि वदला, ' हे भाग्य हो केवढे !'
एखादे सुखस्वप्न काव्यरसिका देईल भारी सुख
ऐशा रम्य विचारभूमिवरती त्यांची जमे बैठक

आले तोंच कुणी पुकार करुनी ' आहात का हो घरी ?'
वाण्याचे बिल त्याजपाशि दिसले ते पाचशेच्या वरी
सारे मावळुनी विचार, तुटले ते स्वप्न की सत्वरी
शाईची कुणि दौत सांडलि जणू रंगीत चित्रावरी

त्याला पार कसाबसा ढकलिता येई दुजे संकट
कोणी सेवक गर्जला, ' मदत द्या दुष्काळग्रस्ताप्रत !'
नाणे एक खिशातुनी उचलुनी त्याते दिले फेकुनी
पीडा ती टळली म्हणून धरली हाती पुन्हा लेखणी

बेबी धावत येउनी बिलगली, बोले स्वरे कोमल
' वर्गाचे गुरुजी इमारत निधीसाठी घरी येतिल '
साऱ्यांनी जणु चंग बांधुनि तदा केले मनी निश्चया–
' त्यांचा स्वप्नसमाधिभंग करूनी ते काव्य न्यावे लया !'

जाई काव्यलता सुकूनि म्हणुनी आई उभी राहिली
बाबांच्या जवळी, हळूच वदली, ' का बातमी ऐकिली ?
स्त्री-संघे निवडून नाटक नवे, केले मला नायिका
रांगेला पहिल्या बसून करणे माझ्या गडे कौतुका !'

छद

बाबांच्या मनिची खुलून कलिका, उत्साह दाटे मनी
'वा ! वा ! सुंदर !' येति शब्द वदनी शाबासकी घेउनी
'तू माझी कविता, अशी सुखविता, का काव्य हे खर्डुनी
त्या स्वप्नी रमुनी वृथाच शिणवू मी आपुली लेखणी ?'

बाबांच्या सदनी पुन्हा न घडती त्या लेखणीला श्रम
कोरे कागदही हवेत उडती आता पतंगासम

----

## १३. अशी बालमुद्रा

बाबा लेखनकार्यमग्न असती अभ्यास भाऊ करी
कामाचे उपसून ढीग पडली आई बिछान्यावरी
खाऊचा भरला डबा उघडण्या तो बाळ येई पुढे
त्याची ती 'भयकंपिता' परि तदा मुद्रा मला आवडे

शोभादर्शक मांडिल्या कितीतरी वस्तू दुकानातुनी
'न्यावी एक तयातली निजगृही' बाळास वाटे मनी
बाबांनी प्रतिकारिता त्वरीत ती आई तया हाति दे
त्याची ती 'विजयांकिता' परि तदा मुद्रा आवडे

बाबा वर्णिति बालकास अपुले प्राविण्य खेळातले
आईही म्हणते, 'कलेत पाहिले बक्षीस मी घेतले !'
दोघेही शिरजोर होउ बघता स्पर्धेविना त्यापुढे
त्याची थंड हिमालयापरि' तदा मुद्रा मला आवडे

बोले बाळ, 'प्रवास आपण करू यंदा विमानातुनी !'
त्याते पितृमुखी नकार मिळता आई वदे तत्क्षणी
'त्यासाठी प्रतिमासि शिल्लक गडे हातून माझ्या पडे'
बाळाची 'कुतूहल जागृत' तदा मुद्रा मला आवडे

बाबा येति खुशीत आणि म्हणती गाणी सिनेमातली
आई साथ करी तयास पुढती घेऊन पद्यावली
घेई लोटुनि दार, बालक बघे त्या प्रश्नचिन्हाकडे
त्याची ती 'असहायगंभिर' परी मुद्रा मला आवडे

हाती कागद पेन्सिलीसह उभा दारात घेणेकरी
आई आतुनि येउनी म्हणतसे, 'नाहीत हे हो घरी !'
बाबा भिंतीपलीकडून बघता बाळास कोडे पडे
त्याची 'निव्वळ प्रेक्षणीय' परि ती मुद्रा कोणा आवडे ?

----

*

## १४. तेव्हापासुनि

सृष्टीचे रमणीय रूप बघण्या 'प्रीति' नी 'सौंदर्य' ते
हाती घेउनि हात चालति पथी ती यौवनी दैवते
चन्देरी रसरंग ते उधळुनी दिव्यप्रभा दावुनि
शांतीचे अधिराज्य भूवरि करी तेव्हा निशा चांदणी

आकाशी नव पौर्णिमा उगवली संपूर्ण चन्द्रासवे
झाले जागृत भावप्रेम झरली ती प्रीतिची आसवे
आशापूर्ण स्थिरावली नजर ती पाहूनि चन्द्रानना
'वाक्पूर्ती करि सत्वरी !' म्हणुनि ती त्याते करी प्रार्थना

सौंदर्ये परि घेतले निरखुनी दृश्यास या मानसी
द्वेषाग्नी भडकून अंतरि, 'वदे 'ही बात आहे अशी !'
चन्द्राते अपशब्द बोलुनि करी निर्भत्सना प्रीतिची
(ते सारे परि काव्यरूप करूनी का दाखवू ती रूची ? )

मैत्री, ओळख सर्वथा विसरूनी ते सोबती आपुले
हस्तांदोलन तोडुनी झडकरी, गुद्यांवरी पोचले !
सौंदर्ये अपुली निव्हा गमविली त्या घोर युद्धामुळे
प्रीतीच्या नयनास मार बसता दृष्टी पुन्हा ना मिळे

तेव्हापासुनि प्रीति अंध बनली, सौंदर्य झाले मुके
दुर्दैवी रसिका ! खरे सुख असे लोकीच या पारखे !

----

## १५. वैधव्यातिल सौभाग्य !

भर उन्हात अवचित पाऊस यावा जसा
तो उभा ठाकला माझ्या द्वारी तसा
तत्क्षणी आतुनी पुशिले, 'आहे कोण ?'
तो तोच असावा, मनास होती जाण

तो रुबाब त्याचा, रूप ईश्वरी देणे
आर्जवे आदरे साऱ्यांशी बोलणे
परि आज पाहुनी वदन तयाचे म्लान
नच ओळखिले मी काही कारण–चिन्ह

निज संसाराची कहाणी कलाहांकिता
पत्निची आपुल्या वित्तगर्विता कथा
हृत्बंध तोडुनि म्हणे मला–वहिनीला
'का उभ्या पाठिशी दुर्दैवाच्या लीला ?'

बोलला या परी, परी करी ना त्रागा
म्हणतसे 'झोपण्या जरा मला द्या जागा !'
चटईस घेउन पडे तसाच पुढच्यात
बालकाप्रमाणे झोपुनि गेला शांत

निद्रिस्त म्हणे तो पत्निस स्वप्नामाजी
मम मनी तयाची स्मृती अजुनही ताजी
'तू निष्ठुर नारी, सदा मिरविते ताठा
तू हृदयशून्य, तव गर्वचि सारा खोटा !

बघ जरा आपुल्या जोज्वळ वहिनीकडे
घे नीतिरीतिचे तिथुनी शिकुनी धडे
मृत पतीस संतत देते हृदयि विसावा
ही दयामूर्ति, ही शीलवती. ही विधवा !'

ते वचन ऐकुनी खचित मन्मनी द्रवले
निद्रिस्त जरी तो, तरी त्वरित मी उठले
पति चित्रवन्दना आले देवघरात
नत मस्तक होता जुळले दोन्ही हात

संदेश धाडुनि पाचारण मी केले
पत्निशी तयाच्या हितगुज माझे झाले–
'अस्वस्थ पतिस तव घेउन जावे सदनी
काळजी तयाची घ्यावी रात्रंदिनी !'

पावले तयांची वळता वदनावरी–
का कशा अचानक गळल्या अश्रूसरी ?
ते स्वप्नवचन जर नसते मज आकळले
वाकड्या पावली असते तत्क्षणि वळले

ज्या नीतिरीतिचा केला त्याने दावा
तो जपेन जीवनि नित्य निरंतर ठेवा
मी पतीप्रीतिने करीन जे कर्तव्य
या वैधव्यातिल असेल ते सौभाग्य !

----

## १६. दानत

(इच्छा म्हणजे सदिच्छा आणि दानत म्हणजे बद्-दानत हे जर खरे असेल तर या दानतीची ओळख करून देण्याची जरूरच काय ?)

दु:ख द्यावे बांधवांना । मला सुखे दे तेवढी
त्यांची वेळ चुकोनिया । मला मात्र मिळो गाडी
शिळे पाके तया पोटी । अर्धीमुर्धी ती भाकर
पंच पक्वानांच्या ताटी । मला येऊ दे ढेकर
एकादेच वस्त्र तया । अनवाणी पायपिटी
माझ्याद्वारी वाहनांची । सदा होऊ द्यावी दाटी
माझ्या हातूनिया घडो । राजकारणाचा खेळ
जीवनात साऱ्या क्षेत्री । माझा हिरोचाच रोल
दानासाठी नको धन । विद्वत्तेची नसो हाव
अध्यक्षीय स्थानासाठी । सर्वामुखी माझे नाव
जेथे तेथे माझी सोय ! कधी स्पर्धा झाली तरी
मला लॉटरी बक्षीस । मिळो त्यांच्या पैशावरी
काय मागू आणिक ते । देगा देवा हेचि दान
त्यांचा अंत व्हावा येथे । मला पाठवा विमान

----

*

२५६६ काव्य २५६६ ११३८९ ... शाखा

## १७. मिष्किल प्रश्न

ती एके दिवशी खुषीत असता प्रेमे म्हणे त्याजला
'ज्याचे तू करतोस वर्णन, तुझा दाखीव तो 'बंगला'
त्याच्या मानसि आग्रहाविण दुजे होते न काहीतरी
गेले तत्क्षणी बंगल्यावरि तदा दोघे दुचाकीवरी

सारे सुंदर शिल्पकाम बघुनी आनंदली ती सुखे
आश्चर्यात तरंगता तिजमुखी ओसंडली कौतुके–
'आकाशी उडण्यास पंख मिळुनी होते जरी पक्षिणी
आधी या तव बंगल्यावर सुखे काढीन मंजुध्वनि !

आकाशी जलवाहिनीच असते मी मेघमाला जरी
धारानृत्यचि बंगल्यावर तुझ्या सर्वांत आधी करी
आकाशातिल चंद्रिका धवल मी होईन दैवे जरी
सर्वांगी तव बंगला उजळुनी टाकीन आधी तरी !'

ऐशी बोलुनि भावपूर्ण वचने किंचित् पुढे थांबली
त्यायोगे पुसण्यास प्रश्न सहजी संधी तया लाभली
'आकाशी असतीस वीज जरि तू, हा बंगला पाहुनी–
आधी कोसळतीस त्याजवरती का तू बये मोहुनी ?'

----

## १८ वृक्षपालवी

तांबुस हिरवी नवी पालवी अंगावर बघुनी
वाटेवरचा वृक्ष थोरला झाला खूष मनी
प्रसन्न मुद्रेसवे म्हणे तो हरेक पथिकाला
'बघा बघा हो आज आमचा पुनर्जन्म झाला'
तृप्त पालवी दो दिवसांनी खुलली सर्वांगी
जीवन अपुले जाणू म्हणते त्या वृक्षालागी
निजबाळांची उत्सुकता ती पाहुन बालवयी
वृक्ष बोलला सद्भावाने कौतुकल्या हृदयी
'वाढत वाढत तुम्ही यापरी रहाल मजजवळी
विभक्त होण्याची या पुढती भीती नच उरली
वसंत ग्रीष्मासवे सवे विहरता आनंदी व्हाल
उंच शिखेवर पक्षिगणांची गाणी ऐकाल
उद्योगी मधमाशा करतिल फांदिवरी पोळे
दगडफेक परि दिसो न म्हणुनी बंद करा डोळे
पतंग-दोरा उंचावरती जाता गुरफटुनी
नको नको त्या शिव्या तेधवा पडतिलही कानी
शांत रात्रिला बसून करता कुणी प्रीतिगोष्टी
सरा बाजूला, करा त्यावरी चन्द्रकिरणवृष्टी
कधी भुकेल्या जनावरांच्या मुखात पडताना
'जीवन सार्थक झाले' याचा हर्ष मनी माना
मेघगर्जना, वादळवारा करतिलही हाल
धीर सोडता, गळून पडता पायदळी जाल
भविष्यवाणी कथीत होता वृक्ष जरी संथ
बघता बघता गदगदला त्या वृक्षाचा कंठ
स्मरले त्याला बोल ऐकिले आदल्या दिवशीचे

बोलत असता सेवक दोघे नगरपालिकेचे
'पक्का रस्ता बांधुनि होईल मार्ग नवा इकडे
हुकूम होता क्षणीच करू या वृक्षाचे तुकडे !'

---

## १९. आई

ऐंशी उन्हाळे आणि पावसाळे
पाहून थकलेली तू !
त्या दिवशी ऐन थंडीतही
स्नान करुन, स्वच्छ होऊन
आदल्या रात्री घेतलंस तसं,
देवाचं नाव घेतलंस तू !
पोटभर जेवून आणि वर
हिच्या हातून साखरमिश्रित पेलाभर दूध घेऊन
दुपारी पलंगावर अंग टाकलंस तू !
आणि नंतरच्या त्या निद्रेत,
त्या निद्रेत चिरनिद्रेचं सुख अनुभविलंस तू !
कुणाला ठाऊक नव्हतं,
तो तुझा शेवटचा दिवस होता म्हणून !
त्या शेवटच्या दिसाप्रमाणे
शेवटचा घास–शेवटचा घोटही
गोड केलास तू !
तुझं भाग्य किती थोर !
अखेरीस अन्नपाणी वर्ज्य असल्याच्या स्थितीत
कष्टत, तळमळत इहलोक सोडणाऱ्या
हतभागी जिवांच्या दुःखदायक हकीकतीपुढे
तुझ्या सुखी मृत्यूची
ही अमर कहाणी किती थोर !
कुणीतरी म्हणालं,
पोटभर जेवून, तृप्त होऊन
अखेरची विश्रांति घ्यायलासुद्धा

गाठी पुण्य हवं, भाग्य हवं !
नातेवाइक– वडिलधारे–स्नेही–सोबती–शेजारी पाजारी
सारेजण म्हणतात– पिकलं पान गळून पडलं !
थकल्या देहाला
सुखाचं–भाग्याचं मरण आलं !
साऱ्यांचं हे म्हणणं पटतं.
आणि म्हणूनच की काय,
अशा दुःखाच्यावेळी सुद्धा
सुखानं मन किंचित मोहरून उठतं.
पण–पण त्याच क्षणी
आई,
तू अजूनही हवी होतीस
असं का वाटतं ?

----

## २०. प्राणी संग्रहालयात मानव

'तू सिंहासम शूर हो !' म्हणून दे आशीष कोणी कुणा
श्वानाचाहि असो त्वदंतरि सदा तैसा इमानीपणा
घारीच्या नजरेतुनी बघत जा केव्हाहि ध्येयाकडे
खारीची तुज लाभुनी चपळता जावे पुढे अन् पुढे

राहो काटक अंग अश्वसम अन् घ्यावी गरुडासम
तू शत्रूंवर झेप, सारुनि दुरी तो मानसीचा भ्रम
हत्तीचे बळ संकटी झगडण्या देही तुझ्या साठवी
किंवा युक्तिस दाविण्या झडकरी कोल्हयाप्रती आठवी

हंसाचे किती नेत्ररम्य दिसते डौलामुळे चालणे
गाणे कोकिळकंठि ते परसुनी होतात वेडी मने
सौंदर्याप्रत व्यर्थ सर्व उपमा त्या एक मोराविण
घ्यावा की फुलपाखराकडुनि तो स्वच्छंदतेचा गुण

उद्योगी मधुमाक्षिकेसम सदा गुंतून घे जीवनी
दे दीनाप्रत घास जेवि चिमणी देई पिला आणुनी
द्वेषाचा लवलेश ना मनि असो, सारीच की आपुली
सौख्ये संघटना उभारून रहा मुंगी जशी वारूळी

अम्ही मानव यापरी स्मरतसू पक्षी–पशूंचे गुण
साधी माणुसकी परी विसरणे वाटे जणू भूषण

*

## २१. तू आणि मी !

तू ब्रह्म हो, मी माया होईन.
तू जीव हो, मी काया होईन.
तू प्राण हो, मी प्रतिष्ठा होईन.
तू जीवन हो, मी निष्ठा होईन.
तू संकल्प हो, मी सिद्धी होईन.
तू चमत्कार हो, मी प्रसिद्धी होईन.
तू स्वभाव हो, मी प्रकृति होईन.
तू रंग हो, मी आकृति होईन.
तू स्वर हो, मी लिपी होईन.
तू कृष्ण हो, मी गोपी होईन,
तू चंद्र हो, मी निशा होईन.
तू पथिक हो, मी दिशा होईन.
तू विद्वान हो, मी दक्षिणा होईन.
तू अश्वत्थ हो, मी प्रदक्षिणा होईन.
तू कवि हो, मी स्फूर्ति होईन.
तू जेता हो, मी कीर्ति होईन.
तू अभ्यास हो, मी प्रगति होईन.
तू आत्मा हो, मी सद्गति होईन.

----

*

## २२. आम्ही

वेगे धावति वाहने सततची चिंता न त्यांच्या उरी
श्रेष्ठत्वा अपुल्या सदैव जपती स्पर्धेत रस्त्यावरी
विद्यार्थी अति धाडसी पळतसे यें मागुनी वाहन
क्षणमात्रे करि त्या जिवा चिमुकल्या निष्प्राण निश्चेतन

धक्का देऊनि दूर लोटुनि पळे कोणी दुचाकी झणी
सारे खाद्यपदार्थ सांडुनि त्वरे त्या हातगाडीतुनी
तो कल्लोळध्वनी पथी परिसता प्राणी, मुले धावती
किंवा तत्क्षणी वाहनास पुढच्या लोटांगणे घालती

एखादी निजनादमग्न युवती सालंकृता पाहुनी
दागीन्यास्तव पाठलाग करितो कोणी तिचा मागुनी
घाई गर्दित वाहनात शिरता होतो रिकामा खिसा
नोटा मोजित मात्र दूरवरती तो चोर हासे कसा !

आम्ही या घटना सुखे सहजची ' वरचेवरी ' पाहतो
आम्ही उंच इमारतीत अगदी उंचावरी राहतो !

----

## २३. शोध

कोणी एक विद्वान म्हणाले,
राणी लक्ष्मीचे हौतात्म्य स्वार्थामुळे घडले.
मी ते शांतपणे ऐकले.
आणखी एक विद्वद्वाणी गर्जली,
' कोण कुठली यवनकुळी
तिला म्हणे शिवाजीने गौरविली
जणू माउली आपुली !
ही थाप आहे इतिहासातली !'
इथे तर माझी वाचा थंड झाली
पण नंतर वाटले, आपणहि बोलावे
लोकांनी ऐकावे, आदरावे
संशोधक म्हणून संबोधावे.
वर्षे थोडी लोटली,
मनी कल्पना ही रुजली
एका रात्री अलगद पापणी मिटली
गाढ झोप लागली
नवनवीन स्वप्ने पाहिली
आणि वाणी आनंदाने वदली
' राम आणि कृष्ण भारतीय नव्हतेच मुळी !'
वाटले, कुणीतरी म्हणेल, ' वाहवा !'
पण छे ! वडील चिमटा घेत ओरडले,
' चूप बस गाढवा !'
आणि नंतर–नंतर
बावीसाव्या शतकातला

विदेशी पदव्यांची झूल पांघरलेला
माझा खापरपणतू
आपल्या 'अर्वाचीन इतिहासात' लिहिता झाला,
'स्वराज्य प्राप्तीनंतरच्या पस्तीस–चाळीस वर्षांत
सुवर्णयुग अवतरले भारतवर्षात !
न्याय, नीती, शिस्त
प्रजा सुखी समस्त !
धान्य साठविण्या जागा नव्हती
म्हणून भरली पक्ष्यांची घरटी
नळातून घ्यावी हाती
दूध–तूप भरली लोटी !
पूर्वी कधी लाभला ना
असा सुबत्तेचा जमाना !'

———

## २४. अश्शी कविता

‘ मी अश्शी कविता लिहीन ’ म्हणुनी निर्धार केला मनी
कामे तत्क्षणि दूर सारुनि धरी हातात मी लेखणी
स्फूर्तीचा झटका कवीप्रत कधी देईल का स्वस्थता ?
हे जाणून लिहावयास बसलो खोलीत मी एकटा

सारे सुंदर शब्द ते प्रकटले त्या दीर्घ काव्यातुनी
येती मोहक गंध घेऊनि सवे वा अमृता प्राशुनी
‘ अश्शी ही कविता, हिला अमरता लाभेल ’ हे भाकित
श्रद्धापूर्वक अंतरी करून मी केली सही ऐटित !

अश्शी ती कविता प्रसिद्धिस्तव मी संपादका देउनी
उत्साहे वदलो, ‘ पहा गुण हिचे घ्या थोरवी जाणुनी
ह्याची कल्पकता इथे विलसते, त्याचेहि द्रष्टेपण
तेजस्वी प्रतिभा अमूक कविची देई पुन्हा दर्शन. ’

‘ त्याचे सद्‌गुण ठाऊकी, परि तुझे वैशिष्टय ते दाखवी ’
अस्सा ऐकुन प्रश्न मात्र पुरता भांबावला हा कवी !
तै संपादक निर्विकार करुनी, मुद्रा मला बोलले
‘ शाई-कागदही सुरेख परि ते आहेत का आपुले ?’

रद्दीला नित देत आश्रय उभी, पाहूनि ती टोपली
‘ अश्शी ती कविता ’ अशी उचलली अश्शीच भिर्कावली !

----

## २५. श्रावणमास

श्रावणमासी हर्ष कशाचा ? मनात चिंता दाटतसे
सण सुट्टयांनी खर्च वाढता सदा रिकामा खिसा असे
कृष्णमेघ कधि नभा व्यापिती, निळी दिसे कधि झालर ती
शुष्क कोरडा सारा महिना, कधी नद्यांना पूर अति !
लोकमान्य स्मृति करू साजरी राष्ट्रभक्तिचे स्थानचि ते
सांगू त्यांना ' स्वराज्य असुनी सुराज्य ते ना आढळते !'
स्वातंत्र्याच्या दिवशी आपण ध्वजास वंदन चला करू
शपथ घेऊनी उत्साहाने दुसऱ्या दिवशी परि विसरू
बेचाळीसच्या क्रांतिदिनाची ' चले जाव 'ची होय स्मृती
परदेशाशी निष्ठा ज्यांची इथे तयांची परि वसती
लोकशाहिच्या बाता मारित निमित्त हरताळासाठी
बघति शोधुनी कुणी पुढारी, अनुयायी परि विद्यार्थी
विद्यार्थीगण असे मोकळा, उपभोगी तो सर्व सुखे
चित्रगीत ते मुखी गाउनी ' आया सावन झूमके
शनि-सोम'ची सुट्टी त्याची चित्रपटाची सोय करी
भाववाढ ही जरी ढाळिते अपुल्या नेत्री अश्रुसरी
गूळ साखऱ्या महाग झाला, धार तुपाची गेली हो
तेलाची दरवाढ फोडिते रोज आपुल्या मुखि टाहो
जनसेवेचे व्रीद विसरला नफासंग्रही व्यापारी
महर्गतेचा फणा काढुनी नागोबा तो फुत्कारी
जुन्या कहाण्या विसरा आता नवी कहाणी घडताना
परिस्थितीचे चित्र भयानक दिसते उघडया डोळयांना
आम्ही ब्राह्मण नावापुरते गाठ पडेना कर्माशी
आचाराचा धर्म वेगळा, करू श्रावणी आम्ही कशी ?
सर्व्हिसपायी वेळ मिळेना मंगल गौरी पूजेला

घरोघरी नव विवाहितेला, जिवतीच्याही सवाष्णीला
दोन घास खा पोटापुरते, पक्वान्नांची बात कुठे ?
भाऊराया, आज तुझ्यास्तव रक्षाबंधन हे नुसते !
उपास कसला, उपासमारी बघा उडविते कशि दैना
शिळा सप्तमी शिळीच असते ताजी केवळ विवंचना
करु प्रार्थना जन्मदिनी तुज गीतागायक श्रीकृष्णा,
गोवर्धन हा अवघड झाला उचलायाला येइ पुन्हा !

----

## २६. पुढाऱ्याची विरामचिन्हे

(कै. गोविंदाग्रज आणि कै. केशवकुमार यांची क्षमा मागून)

नाही शिक्षण, ना कला तरि करी मी आरडा ओरडा
साधाही पुसण्यास प्रश्न अगदी राही उभा सर्वदा
केला एकदिनी उपाय म्हणुनी मतिशिक्षके यावर
त्रासाते चुकण्यास नेमिति मला वर्गात 'मॉनीटर'

वर्गाचे जरि होइना, मजकडे आले पुढारीपण
सत्ता गाजविण्या सुसंधि मिळता संतुष्ट होई मन
एकामागुन एक स्वप्न मजला भाग्योदयाचे पडे
तेव्हा 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोहीकडे

सौवर्णास सुगंध, साखर जशी दुग्धास वा ती मिळे
होई लाभ तसा पुढे मजप्रती त्या लोकशाहीमुळे
टाकी अर्ज उमेदवार म्हणुनी मी (नित्य) निर्वाचनी
केला 'अर्धविराम' त्याक्षणि नवा उद्योग तो जाणुनी

'माझ्यावाचुन का तुम्हास दिसतो कोणी दुजा लायक ?
नाही काय खऱ्या कसोटिसमयी मी एकटा सेवक ?
माझा काय न शब्द भाव मिळुनी पोचेल सत्तेप्रत ?'
केला सर्व प्रचार या परिस मी तै 'प्रश्नचिन्हांकित'!

सारा डाव परंतु तो उलटुनी हो दृश्य की वेगळे
माझ्या मात्र विरोधका बहुमते सद्भाग्य ते लाभले
गेले भाग्य दुरी, धना गमविले, दुःखाप्रती अंत न
'झाले हे भलतेच की !' वदतसे 'उद्गारवाची' मन !

कोळ्याचे स्मरुनी उदाहरण मी मोठ्या प्रयत्ने पुन्हा
जागा जिंकुनि ‘ स्थान ’ ही मिळवुनी लोका दिल्या यातना
लोकांच्या हृदयी मुळीच नव्हते माझे कधी आसन
घेतो ‘ पूर्णविराम ’ आज म्हणुनी अज्ञात मी राहून

----

## २७. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये

(सांप्रतचा महाराष्ट्र)

' मराठभूमी कणखर येथे अनावृष्टि होते
दगडांच्या या भूमीमध्ये काय कुठे रुजते ?'
प्रश्न रोख तरि चोख उत्तरे कविवाणी देते
महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !

या मातीचा धर्म वेगळा, रंगरुप भिन्न
ज्ञान, कला अन् कष्ट याहुनी पिकत नाहि अन्य
त्रैशतकांचे नको दाखले सांप्रतही येथे
महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !

संत विनोबा भूदानाचा दाविति नवमार्ग
तत्त्वासाठी देशमुखांचा मंत्रिपद त्याग
मना वाटते, पाहुनि ऐसे कृतीशील नेते
महाराष्ट्राच्या भूमीमध्यें सोने सापडते !

गणितसिद्धिने चमकुन गेले ' नारळिकर ' नाम
आंतरराष्ट्रिय ख्याति पावले व्ही. शांताराम
शिखरावरुनी कीर्तिपताका सर्वांना सांगते
महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !

किर्लोस्कर – उद्योग पावला विश्वमान्यतेला
सह्याद्रिचा पुत्र धावला हिमाद्रि हाकेला
त्यांच्या हाती यश–प्राप्तीला पाहुनिया वाटे
महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !

'आई श्यामची' पदक मिळविते राष्ट्रपती हस्ते
'ययाति' कादंबरिला बक्षिस ज्ञानपीठ देते
अमर कलाकृति पाहुनि ऐशा मान्य जनी होते
महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !

गंधर्वांचा लाडिक अभिनय दावी नच अन्य
पार्श्वगायिका लता आमुची असे विश्वमान्य
रसिक ऐकुनी म्हणे तयांची नाट्य चित्र गीते
महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !

क्रिकेट मंदिरि देवधरांची कळसासम कीर्ती
गावस्करची ध्वजा फडकते त्या कळसावरती
मान आणखी शान वाढता सहज मुखी येते—
'महाराष्ट्राच्या भूमीमध्ये सोने सापडते !'

----

## २८. विठ्ठला

सांगाया तुजला सुसंगतपणे अंतर्मनीची कथा
आलो द्वारि तुझ्या विनम्र वदने सोशीत साऱ्या व्यथा
गेला अंतरिचा प्रफुल्लितपणा शक्ती निमाली पुरी
त्या योगे ढळली क्षणात मनिची उत्साह स्फूर्ती खरी

वाटे की बघशील तू मजकडे उंचावुनी दृष्टिला
केली तत्क्षणि प्रार्थना मनि परी आली मुळी ना फळा
आनंदे हसशील तू भवतिचा सारुनि गोतावळा
आशा ही परि पूर्ण फोल ठरली थंडावला मामला

त्यांचा केवळ एक मी प्रतिनिधी, शक्ती न लाभे जया
इच्छा अंतरिची असूनि प्रबला द्वारी तुझ्या यावया
त्यांचा सांगुनही प्रणाम तुजला, केलीस ना चौकशी
तू नाही पुशिले, ' स्थिती नि प्रकृती आहे तयांची कशी ?'

काही प्रेम असेल अंतरि जरी या माणसांचे तुला
स्थानाचा अपुल्या तरी त्वरित तू सोडूनि द्यावा लळा
या वातावरणी इथे क्षणभरी थांबू नको तु मुळी
जा त्यांच्या जवळी, रहा सततची उद्धार त्यांची कुळी

त्यांच्या पार करावया अडचणी गेलास नाही जर –
' कैवारी नच,' विठ्ठला, तुज म्हणू, ' काळाच हा फत्तर !'

-----

*

शुद्ध
क्र. ५९४६
दि. १०.४.८६

## २९. दुःखसुखाची कथा

शुभ्र मोकळ्या दंतपंक्ति अन् लाल चुटुक ओठ
हसतमुखी ती मुग्धबालिका कोमल अन् शांत
अंगांगातुनि विलसत होती कोमल लाडिकता
गोविंदाग्रज कविची वाटे 'चिमुकलीच कविता!'
प्रसन्न खेळकर चन्द्रमुखी ती दिसे जरी शांत
बोचत होती तिच्या मनाला एक तरी खंत
तिने मैत्रिणीमुखे ऐकिल्या रागा-लोभाच्या
कथा खेळकर आणि खोडकर त्यांच्या भावांच्या
'भाऊ नसता कशा तयाच्या बोलाव्या गोष्टी?'
ही दुःखाची जाणिव तिजला सतत करी कष्टी
असाच असता तिजसंगे मी बोलत एकदिनी
चकित जाहलो तिची ऐकुनी मुग्धमधुर वाणी–
'आजोबा हो, वर्गामधला अमुच्या तो विजय
तसाच अमुच्या शेजारिल तो छोटासा अजय
विद्याभ्यासासवे खेळता म्हणतो मज, 'ताई'
सांगा तर मग कशास म्हणू मी मज भाऊ नाही?'
सांगू लागली गोष्ट या परी अनेक भावांची
हृदयकथा ती उणिवेची अन् तिच्या पूर्ततेची
आजोबा जरि तिचा दूरचा झालो मी चकित
थोर मनाची सान बालिका थोरच ती खचित
आणि वाटले, रहस्य मनिचे सांगावे तिजला–
'बहिणरहित मी, मीहि मानितो बहीण गे तुजला?'
वयातले अन् नात्यामधले अंतर परि बघुनी
विरघळले ते शब्द, तयांना नच फुटली वाणी

आणि बोललो पुन्हा मनाशी, तुम्हां सांगतो ते
'आजोबाचे असेच राहो, हे माझे नाते !'
लहान मुलांचा लोभ मज, गमे हौस खेळण्यात
झाले वय तरि अजुनी आहे मला कुठे नात ?

———

## ३०. कै. साने गुरुजी यांना विनंति

धन्य कुलामधि जन्म अर्पिला जगन्नियंत्याने
महाराष्ट्र माउली प्रसवली पांडुरंग साने
मातेची ती, मायेची ती पूजनीय मूर्ति
सहृदय मानवतेची वत्सल वंदनीय विभुती
दीनांसाठी गांधिशिष्य तो लढला झुंजार
'बोले तैसा चाले' उक्ती करीत साकार
वाणीसगे झिजे लेखणी स्वातंत्र्यासाठी
'आई श्यामची' भेट अर्पिली कुमारांस मोठी
वाटे त्यांना, दुःखे अपुली लोप पावतील
नेते हाती सत्ता घेऊनि क्रांती करतील
स्वातंत्र्योत्तर परंतु सारे दुःखच पाहोनी
नैराश्याने मिठी मारली मृत्यूला त्यांनी

तपे लोटली तीन, गुरूजी, तुम्हास जावोनी
दुःख कहाणी पुढची कुठल्या सांगावी वदनी ?
देशामधले धनिक जाहले अधिकची धनवान
देशामधले दीन बिचारे रोज होति दीन
शिष्टाचाराप्रती समजती वेडा अविचार
भ्रष्टाचारामध्ये मिसळतो नव भ्रष्टाचार
इथे कागदावरी कायदा करितो संचार
कडक शिस्तिचा परि नच भेटे कुणी अमलदार
काय जन्मले पूज्य बापुजी भारत वर्षात ?
सत्य-अहिंसा शिकवण त्यांची झाली का लुप्त ?
प्रश्न या परी नित्य पडतसे हरेक व्यक्तीला
अशी दुर्दशा भारतभूच्या आली दैवाला

थोर महात्मे प्रियतम अपुल्या भारत देशात
कार्य आपुले पूर्ण कराया पुन्हा जन्मतात
विचारवंतातील अग्रणी तुम्ही तसे थोर
भारतवर्षी पुनश्च गुरुजी, घ्यालच अवतार
परंतु मृत्यू तसा नको तो परिस्थितीपायी
यास्तव सध्या जन्माची मुळि नका करु घाई !

----

## ३१. तू येणार म्हणून !

तू येणार म्हणून मोर मनचे नाचावया लागले
चित्ताच्या फलकी शशी-रजनिच्या चित्रास मी पाहिले
बोले अंतरि कोकिळा मधुरवे, कैसे कळावे तुला
तू व्हावेस पुरुष अन् अनुभवी हा सोहळा आगळा

तू येणार म्हणून बेत मनिचे सिद्धीस गेले कसे
त्यांची ही तुज मी अनुक्रमणिका हाती दिली राजसे
उत्साहे निजअंतरी उसळता ती स्फूर्तीची भावना
मी कोण्या कविची कशास उचलू भिक्कारडी कल्पना ?

तू येणार म्हणून मी हुडकिता सुट्टीप्रती कारण
आली धावत लेखणी मदतिला आप्ताप्रती मारुन
होते सत्य जयास ठाउक तया मिष्टान्न देउन मी
प्रेमाने विनवी 'कुणासहि खरी सांगू नका बातमी !'

तू येणार म्हणून वेल जुइची मी अंगणी लाविली
नेमाने जलसिंचनी बहरता पुष्पे नि छाया दिली
जाळीचे विणले सुरेख पडदे टांगूनि द्वारावरी
अन्तर्बाह्य गृहाप्रती सजविले पाहावया ये तरी

तू येणार म्हणून मी उघडिली यंत्रे दुचाकीतली
मार्गी ती करणार नाहित पुन्हा शोभा कधी आपुली
तू येणार म्हणून मी चुकवुनी देणेकऱ्यांची बिले
नित्याचे भरुनी फळीवर डबे रांगेत मी मांडिले

तू येणार म्हणून चित्रित करी रंगावली अंगणी
साऱ्या वस्तु पुसून लख्ख करुनी जागी दिल्या ठेवुनी
तेजस्वी पडता प्रकाश किरणे न्यारीच शोभा दिसे
वाटे या सदनाप्रती जडविले की बिल्वरी आरसे !

या कामी बसलो गमावुन परी अंगातली शक्ति ती
तू येणार ! खुशाल ये ! परि कसा मी येउ गे स्वागती ?

----

## ३२ ‘त्यांची’ पगडी

त्यांच्या पाहुनि या जुन्या पगडिला जागृत होते स्मृती
विद्वत्तेसह भारदस्त दिसते ती मूर्ति नेत्रांप्रती
होता भव्य रुबाब, तेज वदनी, वाणी तशी मार्दवी
साऱ्यांना पथदर्शने करित जी मोदे जना तोषवी

त्यांच्या मस्तकि हीच लाल पगडी होती यशोदायिनी
होते मात्र निमित्त मी सहचरी सौभाग्य आकांक्षिणी
हाती अक्षत घेउनी मिरविता सन्मित्र–साप्ताघरी
संसारी शुभकार्यि हीच पगडी होती तयांच्या शिरी

होती ती नच व्यक्ति केवल, जना संस्था गमे प्रेरक
साऱ्या पेच प्रसंगि शब्द मुखिचा हो न्याय निर्देशक
त्या योगे सुजनी प्रणाम, मुजरे, सत्कार तो लाभता
डौलाने पगडी शिरी झळकली, अंगी परी नम्रता

आता पाहुनि या रित्या पगडिला होती मनोवेदना
संसारी कृतकृत्य मी परि कुणा सांगू मुक्या यातना ?
पाहोनी परि नातवाशिरि हिला नाट्यप्रयोगातुनी
‘स्वारींची प्रतिमा दुजी !’ वदत मी जाते मनी हर्षुनी !

———

## ३३. इथे

१

इथे स्वप्नं पडतात फार
खरं काही घडत नाही
सोयीपेक्षा अडचणीच फार
उमज काही पडत नाही.

२

कागदी घोडे नाचतात फार
तथ्य काही असत नाही
कावळे येथे उडतात फार
जटायू कुठे दिसत नाही.

३

शिकलो सवरलो आम्ही फार
आचार काही लपत नाही
दुःखात सहभागी फार
पण कुणाचं सुख कधी खपत नाही.

४

महादेवापेक्षा इथं नंदीच फार
कोणी कुणाला पुसत नाही
दिवाळीपेक्षा शिमगाच फार
कोणी कुणाला हसत नाही.

५

नोटा इथं झाल्या फार
महागाईपुढे टिकत नाहीत
वाहनं पळतात बेछूट फार
अपघात काही चुकत नाही.

६

रात्र थोडी इथं सोंगंच फार
कामाचा मुळी उरक नाही
कामापुरते मामाच फार
कुठ्ठे काही फरक नाही.

७

इथे कामापेक्षा भाषणंच फार
गाजावाजा काही मिटत नाही
दिल्लीत-गल्लीत नेतेच फार
त्राता कुठे भेटत नाही.

८

माणस इथं झाली फार
प्रेम कुठे उरलंच नाही
खायला काळ, भुईला भार
पोट कधी भरलंच नाही.

९

माणुसकी इथं दुर्मिळ फार
मागून काही मिळत नाही
एकूण, बऱ्यापेक्षा वाईटच फार
जगावं कसं कळत नाही.

----

*

## ३४. मनोगत

नको सग्दुणांचा साठा । हवा व्यवहार गाठी
एका प्रतिष्ठेभोवती । भुते सारी गोळा होती
नको पदवीचा सोस । हवा कशाला अभ्यास
तरी माझ्या भाषणास । उभा माणूस माणूस
देतो नवे अश्वासन । त्याची नोंद ठेवी कोण
जनता सदा स्मृतिहीन । टाळ्या हशात विसर्जन
देणगीच्या स्वरुपात । हाती येते विद्यापीठ
काळा पैसा स्वच्छ होत । माझा स्पर्शता हात
चहूकडे माझे जन । जपावया माझें स्थान
लक्ष्मीधरावाचून । व्हावे कैसे उद्घाटन ?
तुमचे दैव माझ्या हाती । मनी असावी निश्चिंती
तुमची माझी नाती गोती । भरा माझी मतपेटी
कार्य असो केवढे । गल्ली होते मागे पुढे
माझ्या विना सारे अडे । लक्ष माझे दिल्लीकडे
नेतेपण मोठेपण । माझ्या स्थानी नाही भिन्न
माझ्यासारखा महान । होवो नयेचि अन्य

---

## ३५. येईल का भारती ?

देही त्राण नुरे, न शब्द वदनी कोमेजली भावना
झाली मूक शिळेपरीस जनता लोपूनि संवेदना
लाभो जीवनचेतना त्वरित या शीला-अहिल्येप्रती
एखादा प्रभु रामचन्द्र म्हणुनी येईल का भारती ?

येते दावित नित्य रुप अपुले अक्राळ विक्राळ ते
आ वासूनि मटर्गता प्रतिदिनी द्वारी उभी राहते
कोण्या शूर्पणखेसमान करण्या शिक्षा तिला संप्रती
श्री रामानुज वीर लक्ष्मण पुन्हा येईल का भारती ?

दीनोद्धारणि निर्मिती धननिधी येथे भले चांगले
चाखायास्तव शर्करा मधुर ती लोभावती मुंगळे
सत्तेचा अधिकार लाभुनि परी स्पर्शी न सत्तेप्रती
श्रीरामानुज सग्दुणी भरत तो येंईल का भारती ?

लाभाचा मनि लोभ संतत वसे, नाही कशाची क्षिती !
निष्ठा, शील, विनम्रतादि गुण ते ग्रंथातची राहती
चारित्र्यास्तव झुंजली नितपरी जी थोर सीतासती
रामाची गुणशालिनी पतिव्रता येईल का भारती ?

आहे शक्ति तरी पराक्रम घडे दीनांप्रती दंडुनी
आहे भक्ति तरी सदा प्रकटते ती वाममार्गातुनी
सत्कार्याप्रति अर्पिली परि जये भक्तीसवे शक्ति ती
तो रामप्रभुदूत मारुति पुन्हा येईल का भारती ?

राजा आणि प्रजा निरंतर सुखे प्रेमे जिथे नांदती
सत्याधिष्ठित रामराज्य परि ते येईल का भारती ?

----

*

## ३६. मुंगीची तक्रार

तुकोबाची मुंगी । आलिये बाहेरा
सोडोनि पसारा । वारुळाचा ॥
शोधित काही । वाटेत थांबते
काय असेल ते । तीच जाणे ॥
चालली सांगाया । तुकोबाते काही
हेतू अन्य नाही । अंतरात ॥
म्हणे अभंगात । ऐकली स्तुति मी
तशीच नेहमी । वागत आल्ये ॥
परी ये आता । जिण्याचा कंटाळा
कंठ हा दाटला । सांगताना ॥
यातना येथली । वदवेना सारी
उपास कितितरी । काढते मी ॥
मिळेना साखर । मिळेना रवा
पूर्वी असे केव्हा । घडले का ?
प्रत्येकाला येथे । मोठेपणा हवा
लहानपण देवा । मज का ते ?

----

❋

## ३७. जिथल्या तिथे ! जागच्या जागी !

शोधता आहात कुठे ?
आम्ही आहोत जिथल्या तिथे !
हो, अडतीस वर्षाच्या काळानंतर
काहीच पडले नाही अंतर !
जणू देऊन चुकलो हमी
म्हणून पुढे गेलोच नाही !
आम्हाला सजीव, सुबुद्ध म्हणता कशाला ?
आम्ही निर्जिव, निर्बुद्ध दगड घेईल त्याच्या उशाला !
आम्हीच आमचे थंड पुतळे
आम्हाला जीवन कुठले ? मरण कुठले ?
हो, मधूनच अस्तित्व येते, भेटतात नेते
जोडतात-हात, निवडणुकीच्या मोसमात
वेळी अवेळी देऊन मते
झिजले हात, झिजली बोटे
मत विकाराचे आम्ही रोगी
आहोत थंड जागच्या जागी !

शोधता आहात कुठे ?
आम्ही आहोत जिथल्या तिथे !
आमचं जीवन म्हणजे क:पदार्थ–महागाईतला
क्षणोक्षणी चेचलेला, ठेचलेला
खाली खल, वर वत्ता, देऊन महागाईभत्ता
मिटत नाही चिंता, सुटत नाही गुंता
आता तुम्ही पहा, पहातच रहा, रुपये देऊ दहा

ताकाच्या एका वाटीला, काडयाच्या एका पेटीला
भाववाढ पक्की खिळलीय् आमच्या अंगी
तिला कवटाळणारे आम्ही अभागी
आहोत थंड जागच्या जागी !

शोधता आहात कुठे ?
आम्ही आहोत, जिथल्या तिथे !
करून पाहिली आंदोलने
आंदोलने म्हणजे लाठीमार, गोळीबार
इथे तिथे बंद संचार
डोळ्यावर पडदे, त्यातून पहायचे नाक्या नाक्यावरचे
रक्त लांछित मुडदे
थारोळ्याचा वाढतो आकार
पण लाठी बंदुकीत मात्र अहिंसेचा जयजयकार
शेवटी कशीबशी करा चौकशी
परिणामी तोंडाला पाने पुसणे, स्वस्थ बसणे
असे आम्ही हतभागी
आहोत थंड जागच्या जागी !

शोधता आहात कुठे ?
आम्ही आहोत जिथल्या तिथे !
म्हणतात, सुखाच्या योजना झाल्या कैक, सगळ्याच तऱ्हेवाइक !
म्हणे, आमच्यासाठी लोण्याचा गोळा काढून ठेवला,
ठेवला, पण अजून नाही गावला, अजून नाही पावला
असेल मधल्यामधे कुणीतरी गटवला, कटवला, मिटवला
आम्ही उपाशी, निस्तेज, निरुत्साही, नाही हालचाल देही
यावर उपाय आहे का काही ?
स्वातंत्र्याच्या एकुणचाळीसाव्या वर्षीहि
आम्ही जोगी, बैरागी !
म्हणून म्हणतो, तेहतीस कोटी देवा, घेऊन अवतार नवा, धावा

पडा, पडा कुणी आमच्या उपयोगी
नाहीतर आहोतच आम्ही
थंड, जागच्या जागी !

---

*

## ३८. स्वराज्यातली कमाई !

हो, विचारता आहा तर सांगतो,
स्वराज्यातली आमची कमाई !

साऱ्या वस्तूंची महागाई
कृत्रिम टंचाई,
रांगेत घुसण्याची घाई
चोर आणि फौजदार भाई भाई
पुढारी आणि व्यापारी ह्यांची दिलजमाई
कोर्टात-कचेऱ्यात अंधार-दिरंगाई
सत्ताधाऱ्यांची बेपर्वाई
या सर्वात भ्रष्टाचार सवाई
परिणामी तुमची-आमची-सगळ्यांची धुलाई अन् सफाई !

असती जिजाई
तर म्हणाली असती, 'परवडली मोंगलाई !'

वाटलं होतं, निवडणूक करील काही नवलाई
पण कसचं काय, ते तर गुंगीचे गीत अंगाई !
उमेदवार बारभाई
त्यांना खुर्ची म्हणजे बासुंदी मलाई
करून घेतात भरपाई
तिथे कुठली आलीय् भलाई न् सच्चाई ?

जर आलीच घडून अपूर्वाई
आणि झाली वर स्वर्गात काही कारवाई

आणि आला खाली भगवान् विष्णु शेषशायी
करायला समेट-शिष्टाई
तर तोही शरण होऊन परिस्थितीपायी
म्हणेल,
'माझ्या बापालाहि आवरत नाहीस, तू माझे आई !'

----

REFBK-0025546
REFBK-0025546

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

प्रभाकर अत्रे यांचे बरेचसे कवितालेखन
वृत्तबद्ध असून प्रामुख्याने शार्दूलविक्रीडित वृत्तात आहे.
वृत्तबद्ध कवितालेखन करणे तसे सोपे नाही.
गणमात्रांच्या बंधनात बसतील अशाच
अर्थपूर्ण शब्दांचा वापर वृत्तबद्ध कवितेत होऊ शकतो.
विषय कोणताही असो,
कल्पना व योग्य शब्दांच्या वापराने
शार्दूलविक्रीडित आणि अन्य
वृत्तातील सुंदर–निर्दोष कविता अत्रे साकार करतात.

साहित्यादि सर्व कलांचे आश्रयस्थान
असलेल्या वडोद्याच्या कुमार साहित्य मंडळाने व
अहमदाबादच्या रचना कवि मंडळाने मराठी
कवितेला दिलेली भेट म्हणजे प्रभाकर अत्रे होत.

छंद हा प्रभाकर अत्रे ह्यांचा
प्रस्तुत काव्यसंग्रह मराठी कवी
मनाला मोहीत करील असा विश्वास वाटतो.

---

प्रतिमा प्रकाशन